महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड,
मानव्यविद्याशाखेंतर्गत अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी.
पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक
मनेष गंगाराम खटावे
एम.ए. (अर्थशास्त्र), एम. फिल्.

मार्गदर्शक
प्रा. डॉ. ए. टी. तवार
संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
(पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र)
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र
अर्थशास्त्र विभाग
ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

फेब्रुवारी - 2018

महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

प्रस्तावना :

भारतीय स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास केला असता लक्षात येईल की, भारतीय स्त्रिया ह्या आजही दुय्यम स्वरूपाचे जीवन जगत आहेत. जातीय स्तरीकरणानुसार त्यांच्या शोषणाची तीव्रता वाढत जाणारी आहे. म्हणजेच खालच्या जातीतील स्त्रियांच्या शोषणाची तीव्रता सर्वोच्च आहे. तर जातीय उतरंडी नुसार जसे-जसे वर जाऊ तस तशी ही तीव्रता कमी होत जाते. म्हणजेच उच्च जातवर्गीय स्त्रियांचे प्रश्न आणि कनिष्ठ जातवर्गीय स्त्रियांचे प्रश्न यात तफावत दिसून येईल. भारतीय कामगारांमध्ये 'स्त्री' कामगारांचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्यातही असंघटित क्षेत्रातील 'स्त्री' कामगारांना अनेक सामाजिक-आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. मुळातच इथल्या आर्थिक-सामाजिक रचनेत स्त्रियांना नेहमीच कमी मोबदला दिला जातो. आजही 90 टक्के स्त्रिया असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यांना किमान वेतन, हक्काची बाळंतपणाची रजा, विमा, बोनस आदी लाभ मिळत नाहीत. इतर कामांप्रमाणेच घरेलू कामगारांच्या कामाला महत्त्वाचे मानले जात नाही आणि त्यांचे समाजातील स्थान देखिल महत्त्वाचे मानले जात नाही. घरेलू कामगार महिला व त्यांच्या मुलांची शैक्षणिक स्थिती चिंताजनक आहे. घरेलू कामगार म्हणजेच मोलकरीणींची सामाजिक-आर्थिक स्थिती अतिशय बिकट स्वरूपाची दिसून येते. घरेलू कामगार महिलांना जात-वर्ग-पितृसत्ता या तिहेरी शोषणाला सामोरे जाणे अपरिहार्य आहे.

बुद्धाच्या वर्णअंताच्या क्रांतीने पूर्वीची गुलामगिरी व्यवस्था नष्ट झाली आणि जातीव्यवस्थेसारखी नवी गुलामगिरी व्यवस्था उदयाला आली. [1] स्त्री शोषण हेच जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहे. जातीव्यवस्था अखंडीत राहावी त्या व्यवस्थेला तडा जावू नये यासाठीच स्त्रियांना संस्कृती आणि धर्माच्या नावाखाली दडपले गेले आहे. तैतरीय संहिता, मनुस्मृती या ग्रंथामधून स्त्रिला निरिंद्रिय म्हणण्यात आले आहे. निरिंद्रिय म्हणजेच जी

[1] *भारतीय मागासलेपणाचा पाया वर्ग की जात,* शरद् पाटील, क्रांतिसिंह नाना पाटील अकादमी, अहमदनगर, 2007, दु. आ. पृ. क्र. 10

अवयवरहित आहे. म्हणजेच तिचा स्वत:च्या अवयवांवर अधिकार नाही, पतीची ज्ञानेंद्रिये हीच तिची ज्ञानेंद्रिये आहेत. नेपोलियन बोनापार्ट स्त्री विषयी म्हणतो, ''अविद्येमुळेच मूर्ख स्त्रियांना आपली उत्पत्ती पुरूषांना सुख देण्यासाठी झालेली आहे, याचे ज्ञान नसते. स्त्रिने चूकून स्वप्नातही आपल्या पतीचे मन दुखविता कामा नये, याचेच नाव पतिव्रता होय''. फ्रान्सच्या नपोलियन प्रमाणेच भारतीय आचाराचे नीतिनियम बनविणारा स्मृतीकार मनू म्हणतो, ''स्त्रियांच्या बालपणी पिता तिचे पालन-पोषण करतो, पती तारूण्यात व पुत्र तिच्या वृध्दावस्थेत तिचे रक्षण करतो, स्त्री स्वातंत्र्यासाठी केव्हाही लायक नसते''. [2] भारतीय समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला असला तरी स्त्री शिक्षणासंदर्भात महाराष्ट्रात दोन विचार प्रवाह दिसून येतात 1) अभिजनवादी आणि 2) सत्यशोधकी, अभिजनांच्या मते, ''कुटूंब हे स्त्रियांचे मुख्य कार्यक्षेत्र असल्याने स्त्रियांना आदर्श गृहिणी व माता बनण्यास उपयुक्त ठरणारे शिक्षण देण्यात यावे''. या विचारवंतात पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् आदींचा समावेश होतो. भारतीय विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष (1948) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् विद्यापीठ आयोगाच्या अहवालात नमूद करतात की, ''स्त्रीने पुरूषांचे अनुकरण न करता जसे पुरूष, पुरूषयोग्य उत्तम शिक्षण घेईल तसे स्त्रिने, स्त्रियोग्य शिक्षण घ्यावे''. याऊलट, महात्मा फुले म्हणतात, ''समतेवर आधारित असा नवा मानवी समाज हा स्त्री-पुरूष समतेशिवाय अस्तित्वात येऊच शकत नाही व स्त्री-पुरूष समता स्त्रियांच्या शिक्षणाशिवाय शक्य नाही.''[3] तर 20 जुलै 1942 रोजी नागपूर येथे आयोजित ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस वुईमेन्स कॉन्फरन्स मध्ये महिलांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, ''स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या

---

[2] *समाजशास्त्रीय परिप्रेक्षातून स्त्रियांची आत्मकथने*, डॉ. प्रतिभा अहिरे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2011, प्र.आ.. पृ. क्र. 42

[3] *सत्यशोधक एल्गार, डॉ. राधाकृष्णन् यांची स्त्रीविषयक भूमिका*, डॉ. दिलीप चव्हाण, नोव्हेंबर 2012. पृ. क्र. 39

समाजाची मी प्रगती मोजित असतो".[4] स्त्री-पुरूष समतेविषयी विचारवंतांमध्ये मतभिन्नता दिसून येते परंतु, स्त्रियांची प्रगती झाल्याशिवाय खऱ्याअर्थाने राष्ट्राची प्रगती होणार नाही. पुरूषांप्रमाणे व पुरूषांइतक्याच स्त्रिया देखिल राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावतात यात तिळमात्र शंका नसावी. त्यासाठीच स्त्रियांच्या आर्थिक -सामाजिक स्थितीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

कॉ. आण्णाभाऊ साठे हे पहिल्या दलित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात म्हणतात, "पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून ती कामगारांच्या तळहातावर तरली आहे". जागतिक पातळीवर कामगारांच्या संघर्षाचा इतिहास फार मोठा राहिला आहे. जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांच्या मते, "कामगारांच्या शोषणातूनच भांडवलाची निर्मिती होत असते". त्यामुळेच कामगारांच्या शोषणाविरोधात जगभरात अनेक स्वरूपाची बंड, उठाव झाल्याचे दिसतात. कामगारांच्या लढ्यांमुळे अनेक देशांमध्ये सत्तांतरे होऊन 'क्रांती' घडून आली. श्रमाला आणि श्रमिकाला नेहमीच दुय्यम लेखण्यात आले आहे. त्यात स्वयंपाक, धुणी-भांडी, झाडलोट अशा अनुत्पादक कौटुंबिक श्रमाला हीन व दुय्यम ठरविले. त्यामुळेच अशी कामे करणाऱ्या स्त्रियांच्यावाट्याला सामाजिक-आर्थिक दुय्यमत्त्व आले आहे. भारतातही कामगारांचे लढे उभे राहिले ते संघटित होवून लढले आणि आजही लढत आहेत. परंतु, असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची मात्र फार दुरावस्था असल्याचे दिसून येते. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्यांमध्ये घरेलू कामगार महिलांची संख्या जवळपास 90 टक्के आहे. जातीव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान सर्वात खालचे आहे तर भांडवली अर्थव्यवस्थेत स्त्री कामगारांचे शोषण मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळेच घरेलू कामगार महिलांच्या सामाजिक-आर्थिक स्थितीचा आढावा प्रस्तुत संशोधनात घेण्याचा प्रयत्न संशोधक करणार आहे.

---

[4] *डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे,* डॉ. बाबसाहेब आंबेडकर चरित्र-साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महराष्ट्र शासन, 2002, खंड 18 वा भाग -2.

घरेलू कामगार महिला अर्थ आणि व्याख्या :

आपल्या घरातील असंख्य व परत-परत करावी लागणारी कामे करणारा मनुष्य हा घरगडी किंवा घरकामगार या संज्ञेने संबोधला (भांडी घासणे, घर व परिसर झाडून स्वच्छ करणे इत्यादी) आणि मुलांची काळजी घेणे यांचा समावेश होतो. घरगड्यांना वेतन दिले जात नाही तर मोबदला दिला जातो (वेतन त्यात वार्षिक वेतनवाढ, महागाईभत्ता, घरभाडेभत्ता इत्यादी बाबी समाविष्ट होतात. मोबदल्यात या सर्वांचा अभाव आधारित असतो) घरगड्यांचे काम करण्यात प्रामुख्याने स्त्रिया कार्यरत असून कुटूंबाच्या भौतिक आणि भावनात्मक गरजा पूर्ण करण्यासाठीची सेवात्मक भूमिका त्या बजावतात. स्त्री-घरकामगारांसाठी आपल्याकडे आपण 'मोलकरीण' या संज्ञेचा वापर करतो.[5]

विदर्भ मोलकरीण संघटना यांच्या मते, "घरेलू कामगारांसाठी 'मोलकरीण' हा शब्द देखिल प्रचलित आहे. लोकांच्या घरी मोलाने काम करणारी स्त्री म्हणजे मोलकरीण. म्हणजेच धुणी-भांडी, झाडलोट व तत्सम कामे करून केलेल्या कामाचा मोबदला पैशाच्या रूपाने घेणारी कष्टकरी स्त्री मोलकरीण म्हणविली जाते".[6]

महाराष्ट्र कामगार विभाग यांच्या मते, "घरेलू कामगार याचा अर्थ असुरक्षित तसेच घरेलू काम करण्याकरिता ठेवण्यात आलेला कामगार असा आहे. घरेलू कामगार यांचे काम हे अंशकालीन स्वरूपाचे असते व ते एकापेक्षा जास्त मालकाकडे काम करतात".[7]

मोलकरणीच्या कामात स्त्रियांप्रमाणेच घरगडी पुरूषांचाही समावेश होतो. परंतु, घरकाम करणाऱ्या स्त्रियांची संख्या ही मोठ्या प्रमाणात असल्याने मोलकरीण हा शब्द प्रयोग रूढ झाला. घरेलू कामगारांचा कामाचाच तपशिल लक्षात घेतला असता लक्षात येईल की, त्यांचे कामाचे स्वरूप विस्तृत व मोठे आहे. यामध्ये धुणी-भांडी, झाडलोट, स्वयंपाक, फरशी पुसणे, भाजीपाला व किराणा आणणे, आयांचे काम अशा प्रकारच्या अनेक कामांचा यामध्ये समावेश होतो.

---

[5] *समाजशास्त्र-मानवशास्त्र,* डॉ. भीमसेन रंगाचार्य जोशी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, जून 2008, पृ. क्र. 191

[6] *विदर्भ मोलकरीण संघटना-25 वर्षांची वाटचाल*, डॉ. रूपा कुलकर्णी, विकास भोंगाडे.

[7] https://mahakamgar.maharashtra.gov.in/ic-domestic-workers-aboutus-mr-htm.

संशोधनाचे महत्त्व : जागतिकीकरणाचा परिणाम म्हणजे संघटित, सुरक्षित रोजगारामध्ये झालेली घट, आणि पर्यायाने असंघटित कोणत्याही संरक्षक कायद्याचे कवच नसलेल्या रोजगारात झालेली वाढ होय. स्त्रियांच्या संदर्भात विचार केला तर त्यांच्या रोजगारावर या आर्थिक धोरणांचे अतिशय गुंतागुंतीचे परिणाम दिसून येतात. मुळातच येथील आर्थिक-सामाजिक रचनेत स्त्रियांना नेहमीच कमी मोबदला दिला जातो. आजही 90 टक्के स्त्रिया असंघटित क्षेत्रात काम करतात त्यांना किमान वेतन, हक्काची बाळंतपणाची रजा, विमा, बोनस आदी लाभ मिळत नाहीत. इतर कामांप्रमाणे घरेलू कामगारांच्या कामाला महत्त्व नसल्याने समाजातील त्यांचे स्थान देखील महत्त्वाचे मानले जात नाही. घरेलू कामगार महिला व त्यांच्या मुलांची शैक्षणिक स्थिती चिंताजनक आहे. घरेलू कामगार महिलांच्या या विविध समस्यांचा अभ्यास करण्याच्यादृष्टीने प्रस्तुत संशोधन विषयाची निवड केली आहे.

समस्यासूत्रण : प्रस्तुत शोध प्रबंधात घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक समस्यांचा वेध घेण्यात येणार आहे. घरेलू कामगार महिलांकडून अतिरिक्त काम करून घेतले जाते का? त्यांच्या कामाचा योग्य मोबदला दिला जातो का? ते ज्या घरांमध्ये कामे करतात त्यांना तिथे सन्मानाची वागणूक मिळते का? त्यांचा समाजातील दर्जा कोणता आहे? त्यांची आर्थिक स्थिती कशी आहे? राहणीमानाचा दर्जा कसा आहे? त्यांच्या मुलांची शैक्षणिक स्थिती, त्यांचे व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य, रजा, सुट्या, पेन्शन, बोनस आणि इतर सोयी सुविधा, घराची स्थिती, व्यसनाधिनता इत्यादी समस्यांना आधोरेखित करणारे हे संशोधन असणार आहे.

संशोधनाची उदिष्ट्ये :

1) घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.
2) असंघटित कामगारांसाठी असणाऱ्या सामाजिक सुरक्षा कायदा, 2008 च्या अंमलबजावणीसाठी येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
3) घरेलू कामगार महिलांना घरेलू कामगार मंडळाकडून मिळणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.
4) घरेलू कामगार महिलांच्या श्रमशोषणाचे वास्तव तपासणे.
5) घरेलू कामगार महिलांच्या राहणीमानाचा आणि सामाजिक दर्जा तसेच त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

6) घरेलू कामगार महिलांना मिळणारा मोबदला, बोनस, रजा आदींबाबत कामगार कल्याणाच्या दृष्टीकोनातून अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

1) महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या श्रमाचे शोषण होते.
2) महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या राहणीमानाचा व सामाजिक दर्जा खालावलेला आहे.
3) महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या पाल्यांची शैक्षणिक स्थिती खालावलेली आहे.
4) महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांना घरेलू कामगार मंडळाकडून योजनांचा पुरेपूर लाभ मिळत नाही.
5) महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांना कोणत्याही स्वरूपाचे बोनस तसेच पगारी रजा मिळत नाही.

संशोधन पद्धती : प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीच्या आधारे माहिती संकलित करण्यात येणार आहे. ‘‘महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास’’. या विषयासाठी पुढील संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

दुय्यम सामग्री : प्रस्तुत संशोधनासाठी लागणारी माहिती, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र, शोधनिबंध/प्रबंध, इंटरनेट विविध घरेलू कामगार संघटनांचे प्रकाशित व अप्रकाशित साहित्य इत्यादी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक सामग्री :महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास या विषयासाठी प्रश्नावली, मुलाखती, सर्वेक्षण व निरीक्षण या पद्धतीचा वापर माहिती संकलित करण्यासाठी करण्यात येणार आहे.

नमूना निवड : संशोधन करीत असतांना संशोधक जरी संपूर्ण समुदायाचे अध्ययन करीत असला तरी समग्राचा अभ्यास करू शकत नाही. त्यासाठी निवडलेल्या प्रतिनिधीक व्यक्तीकडून तो तथ्यांचे संकलन करतो. या निवडलेल्या प्रतिनिधीला नमूना असे म्हणतात. नमूना निवड ही प्रामुख्याने दोन प्रकारात विभागली गेली आहे. 1) संभाव्यता नमूना निवड,

2) गैर संभाव्यता नमूना निवड. गैर संभाव्यता नमूना निवडीचे चार उपप्रकार पडतात. अ) सोईस्कर नमूना निवड. ब) स्वयंनिर्वाचित नमूना निवड. क) सहेतुक नमूना निवड. ड) कोटा नमूना निवड. संशोधनासाठी संशोधक सहेतुक नमूना निवड पद्धतीचा वापर करणार आहे.

सहेतुक नमूना निवड : जेंव्हा संशोधनकर्ता एक विशिष्ट उद्दिष्ट समोर ठेवून जाणिवपुर्वक समग्रातील काही एककांची निवड करतो तेंव्हा त्याला सहेतुक नमूना म्हणतात. या प्रकारच्या नमूना निवडीचा मुख्य आधार म्हणजे संशोधनकर्ता हा समग्रातील सर्व एककांच्या गुणवैशिष्ट्यांची माहिती प्राप्त करतो त्यानंतर तो नमून्याची निवड करतो.

असंघटीत क्षेत्रातील कामगारांची जनसंख्या निश्चितपणे उपलब्ध नसल्याने संशोधक संशोधनासाठी सहेतूक नमूना निवड पद्धतीचा वापर करणार आहे. संशोधनासाठी संशोधकाने महाराष्ट्र राज्याची निवड केली आहे. महाराष्ट्रात एकूण सहा प्रशासकीय विभाग आहेत. सहा प्रशासकीय विभागातील, विभागाची मुख्यालये असलेल्या शहरांचा म्हणजेच मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, अमरावती या शहरांमधून प्रत्येकी 200 घरेलू कामगार महिलांचा म्हणजेच एकूण 1200 घरेलू कामगार महिलांची सहेतुक नमूना निवड पद्धतीद्वारे प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी निवड करण्यात येणार आहे. ज्यात घरेलू कामगार महिला निवडतांना शक्यतो प्रवर्गनिहाय विचार करण्यात येणार आहे.

सांख्यिकीय तंत्र : उपलब्ध माहितीचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मध्यमान, सहसंबंध, आलेख इत्यादी सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालखंड : सदरील संशोधनासाठी 2010 ते 2017 या कालखंडाची निवड करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांचा अभ्यास करण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांचा आर्थिक व सामाजिक अभ्यासाच्या दृष्टीने संशोधन विषयाची व्याप्ती असेल.

संशोधनाची मर्यादा : प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील सहा प्रशासकीय विभागातील, विभागाची मुख्यालये असलेल्या शहरांमधील, घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीच्या अभ्यासापुरतेच मर्यादित असेल.

प्रकरणांची रूपरेषा :

प्रकरण पहिले : **प्रास्ताविक**

या प्रकरणात प्रास्ताविक, विविध कालखंडातील स्त्रिजीवन, कालानुरूप स्त्रियांचा आर्थिक सहभाग, जागतिक स्तर ते महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या ऐतिहासिक पार्श्वभूमी, असंघटित क्षेत्र व घरकामगार, महाराष्ट्रातील राज्यपातळीवर महिलांचा कामातील सहभाग दर तसेच संशोधन पद्धती इत्यादी बाबींचा या प्रकरणात समावेश असेल.

प्रकरण दुसरे : **संशोधन साहित्याचा आढावा**

प्रकरण दुसरे हे घेरलू कामगार महिलांसंदर्भात निरनिराळ्या संशोधकांनी केलेल्या आभ्यासाचा आढावा घेण्यात येणार आहे. यामध्ये विविध लेखकांनी लिहिलेले ग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, संशोधकांनी लिहिलेले शोधनिबंध, प्रबंध आदींचा समावेश केला आहे.

प्रकरण तिसरे : **महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांची सद्यस्थिती**

या प्रकरणात महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांची ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक सद्यस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : **महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा प्रत्यक्ष सर्वेक्षणावर आधारित अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणात महाराष्ट्रातील घरेलू कामगार महिलांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीचा अभ्यास हा प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर प्रश्नावली, मुलाखती, सर्वेक्षण आणि निरिक्षण आदी तंत्राचा वापर करून करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : **निष्कर्ष व शिफारशी** :

अभ्यासा अंती प्राप्त निष्कर्ष व त्या अनुषंगाने शिफारशी प्रस्तुत प्रकरणात देण्यात येणार आहेत.

संशोधक

मनेष गंगाराम खटावे

एम.ए. (अर्थशास्त्र), एम. फिल्.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. ए. टी. तवार

संशोधन मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

(पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र)

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी